Pench Tiger Reserve MAHARASHTRA | महाराष्ट्र वन विभाग | महाराष्ट्र शासन | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**उपसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांचे कार्यालय**

**पहिला माळा, एफ.डी.सी.एम. भवन, ३५९/बी, हिंगणा रोड, अंबाझरी, नागपूर - ४४० ०३६**

**दुरध्वनी क्र. ०७१२ - २८११९२१ Email ID :. dfowlpench@mahaforest.gov.in Website:- www.penchtigerreserve.maharashtra.gov.in**


---

# पेंच व्याघ्र प्रकल्पामध्ये रात्र गस्त, मचानवर रात्रीचे निसर्गानुभव व पुर्ण दिवसाची सफारीकरिता पर्यटकांसाठी सर्वसाधरण मार्गदर्शक सुचना, अटी व शर्ती

पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर अंतर्गत महाराष्ट्र शासन राजपत्र असाधरण भाग चार - अ महसुल व वनविभाग दि. २९/०९/२०१० च्या अधिसुचने अन्वये ४८३.९६ चौ. कि.मी. क्षेत्र बफर झोन म्हणुन समाविष्ठ झालेले आहे. यामधील २०२.०० चौ. कि.मी. बफर क्षेत्राकरिता नागलवाडी (वन्यजीव) व पवनी (वन्यजीव) वनपरिक्षेत्र निर्माण झालेले आहे. सदर क्षेत्र वन्यजीव अभयारण्य किंवा राष्ट्रीय उद्यानाचा भाग नसुन बफर क्षेत्र असल्यामुळे या क्षेत्रात अवैध वृक्षतोड, अवैध शिकार, अवैध चराई इत्यादी वनसंरक्षणाचे निगडीत समस्या आहेत. या भागात वन पर्यटनातुन वनसंरक्षणला चालना देण्याकरिता तसेच स्थानिकांना रोजगार उपलब्ध होण्याचे दृष्टीने नागलवाडी (वन्यजीव) वनपरिक्षेत्रात प्रायोगिक तत्वावर रात्र गस्त, पायदळ जंगल गस्ती, मचान गस्त चालु करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. सदर गस्ती दरम्यान मा. सर्वोच्च न्यायालय यांचे NTCA विरुध्द अजय दुबे या खटल्यातील दि. १६/१०/२०१२ च्या निर्णयाचे उल्लंघन होणार नाही व निसर्ग पर्यटनासंबंधीच्या NTCA यांच्या संदर्भिय पत्रामध्ये नमुद मार्गदर्शक सुचनांचे उल्लंघन होणार नाही याची खबरदारी घेतली आहे. सदर पर्यटनाकरिता खालील प्रमाणे अटी व शर्ती लागु असतील.......

**<u>रात्र गस्त :-</u>**

**१.** निसर्ग पर्यटकांना ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करणे बंधनकारक राहील. तसेच गस्तीसाठी दिलेले घोषणापत्र भरुन देणे व त्याचे पालन करणे बंधनकारक आहे.

**२.** प्रत्येक दिवशी फक्त ०३ वाहनांनाच रात्र गस्तीकरिता नागलवाडी (वन्यजीव) एकसंघ नियंत्रण वनपरिक्षेत्रातील सुरेवाणी व पवनी (वन्यजीव) एकसंघ नियंत्रण वनपरिक्षेत्रातील सिल्लारी (बफर) पर्यटन प्रवेशद्वारातुन जिप्सीद्वारेच प्रवेश दिल्या जाईल.

**३.** गस्तीची वेळ रात्री ०८.३० ते १२.०० वाजेपर्यंत राहील. आवश्यक कागदपत्रे तपासणी साठी पर्यटन प्रवेशद्वाराजवळ गस्ती सुरु होण्याच्या ३० मिनिटे अगोदर उपस्थित राहावे.

**४.** गस्तीकरिता परवागनी देण्यात आलेल्या चमु सोबत एक पर्यटक मार्गदर्शक व वनरक्षक वनपरिक्षेत्र कार्यालयातुन सोबत देण्यात येईल.

**५.** रात्र गस्ती करिता एकुण रु. ३,९००/- शुल्क आकारण्यात येईल. (पर्यटक शुल्क - १,०००/-, जिप्सी शुल्क - २,५००/- व पर्यटक मार्गदर्शक शुल्क - ४००/- = एकुण रु. ३,९००/- फक्त).

६. वनरक्षक, जी. पी. एस. / स्मार्टफोन आणि वाकी टॉकी सोबत बाळगेल व जी. पी. एस. ट्रॅकलॉग रोज वनपरिक्षेत्र अधिकारी यांचे कार्यालयात जमा करेल.

७. पर्यटकांना सर्च लाईट, कॅमेरा, मोबाईल, मद्य, सिगारेट, तंबाखु, घुटका, खर्रा इत्यादी वापरण्यास मनाई असेल. नियमाचे उल्लंघन झाल्यास वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ नुसार कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

८. पर्यटनाचे वेळेत निश्चित केलेल्या जागेव्यतिरिक्त अन्यत्र कुठेही गाडीतुन खाली उतरता येणार नाही.

९. बायनाकुलर वापरण्यास परवानगी असेल.

१०. रात्र गस्तीवरुन परत आल्यानंतर परिक्षेत्र कार्यालयात असलेल्या गस्ती नोंदवहीवर गस्ती दरम्यान आलेल्या निरीक्षणाबाबत माहिती भरणे अनिवार्य राहील.

**मचानवर रात्रीचे निसर्गानुभव:-**

१. निसर्ग पर्यटकांना ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करणे बंधनकारक राहील. तसेच गस्तीसाठी दिलेले घोषणापत्र भरुन देणे व त्याचे पालन करणे बंधनकारक आहे.

२. प्रत्येक मचानवर रात्रीचे निसर्गानुभवाकरिता जास्तीत जास्त ०२ व्यक्तींना परवानगी देण्यात येईल. १८ वर्षाखालील मुलांना परवानगी देण्यात येणार नाही.

३. प्रत्येक मचानकरिता ०१ पर्यटक मार्गदर्शक अनिवार्य असेल.

४. प्रत्येक दिवशी ०४ मचान उपलब्ध असतील. (पवनी (वन्यजीव) एकसंघ नियंत्रण - ०२ मचान व नागलवाडी (वन्यजीव) एकसंघ नियंत्रण - ०२ मचान)

५. प्रति मचान २ व्यक्ती साठी रु. १,०००/- शुल्क आकारण्यात येईल व पर्यटक मार्गदर्शक शुल्क रु. ४००/- असे एकुण रु. १,४००/- भरणा करणे अनिवार्य राहील. पर्यटकांना त्यांचे मचानीपर्यंत पोहचविणे व परत आणणेकरिता जिप्सी वाहनानांचा वापर करण्यात येईल. त्याबाबतचे शुल्क रु. १,५००/- त्या दिवशी उपलब्ध चमुंमध्ये विभागले जाईल. एकाच मचानासाठी चमु आल्यास त्यांना पुर्ण जिप्सी शुल्क अदा करावे लागेल.

६. मचानवर बसण्याची वेळ सायंकाळी ०५.०० ते सकाळी ०६.०० वाजेपर्यंत असेल.

७. निसर्ग पर्यटकांना त्यांचे भोजन, पाणी व इतर तत्सम आवश्यक वस्तु बाबतची व्यवस्था स्वत: करावी लागेल.

८. मचानवर रात्रीचे निसर्गानुभव दरम्यान आमली पदार्थांचे सेवन व बाळगणे, जुगार खेळणे, रेडीओ, सर्च लाईट व मोबाईल वापरण्यास बंदी राहील व वन्यप्राणींना कुठल्याही प्रकाराचा धोका निर्माण करणे किंवा इजा होईल अशी कृती केल्यास वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ नुसार कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

९. मचानवर रात्रीचे निसर्गानुभव दरम्यान कॅमेऱ्याच्या उपयोगावर बंदी असेल. परंतु बायनाकुलर वापरण्यास परवानगी असेल.

१०. छायाचित्र ओळखपत्र अनिवार्य आहे.

११. रात्र मचान गस्ती वरुन परत आल्यानंतर परिक्षेत्र कार्यालयात असलेल्या गस्ती नोंदवहीवर गस्ती दरम्यान आलेल्या निरीक्षणाबाबत माहिती भरणे अनिवार्य राहील.

**<u>संपुर्ण दिवसाची जंगल सफारी</u>**

१. निसर्ग पर्यटकांना ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करणे बंधनकारक राहील. तसेच गस्तीसाठी दिलेले घोषणापत्र भरुन देणे व त्याचे पालन करणे बंधनकारक आहे.

२. पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या फक्त सिल्लारी, खुर्सापार, चोरबाहुली व सुरेवाणी निसर्ग पर्यटक प्रवेशद्वारावरुन प्रायोगिक तत्त्वावर संपुर्ण दिवस जंगल सफारी सुरु राहील

३. यामध्ये सकाळी ०६.३० वाजता पासुन ते सायंकाळी ०६.३० (पर्यटन वेळेनुसार बदल करण्याचे अधिकार पेंच व्याघ्र प्रकल्प विभागाने राखुन ठेवलेला आहे) पर्यंत पर्यटन करता येईल.

४. त्याकरिता **जंगल सफारी शुल्क रु. ३०,०००/- (अक्षरी तीस हजार रुपये फक्त)** इतके आकारण्यात येईल. सदर शुल्कामध्ये जिप्सी शुल्क, पर्यटक मार्गदर्शकाचे शुल्क व कॅमेरा शुल्क समाविष्ठ राहील. तसेच व्यवसायिक चित्रिकरणाकरिता (Commercial Photography) करिता वेगळयाने परवानगी घेणे बंधनकारक राहील.

५. निसर्ग पर्यटकांना त्यांचे भोजन, पाणी व इतर तत्सम आवश्यक वस्तु बाबतची व्यवस्था स्वत: करावी लागेल.

६. पर्यटकांना सर्च लाईट, कॅमेरा, मोबाईल, मद्य, सिगारेट, तंबाखु, घुटका, खर्रा इत्यादी वापरण्यास मनाई असेल. नियमाचे उल्लंघन झाल्यास वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ नुसार कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

७. पर्यटनाचे वेळेत निश्चित केलेल्या जागेव्यतिरिक्त अन्यत्र कुठेही गाडीतुन खाली उतरता येणार नाही.

८. बायनाकुलर वापरण्यास परवानगी असेल.

९. संपुर्ण दिवस जंगल सफारी वरुन परत आल्यानंतर परिक्षेत्र कार्यालयात असलेल्या नोंदवहीवर संपुर्ण दिवस जंगल सफारी दरम्यान आलेल्या निरीक्षणाबाबत माहिती भरणे अनिवार्य राहील.

********